**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २७० ।। सोमवार २७ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# लाचखोरी, खंडणीखोरीतील कर्मचाऱ्यांना अल्पावधीतच सोयीच्या ठाण्यात नियुक्ती!

## एसपींनी केलेल्या जिल्हांतर्गत विनंती बदल्यांमागे गौडबंगाल?

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी शनिवारी विनंती अर्जावरून जिल्हांतर्गत पोलीस कर्मचाऱ्यांच्या केलेल्या बदल्या वादग्रस्त ठरू लागल्या आहेत. गतवर्षी लाचखोरीचा आरोप असलेले 'भाऊ' मुख्यालयातून अवघ्या एक वर्षाच्या आतच त्यांना थेट पोलीस उपाधीक्षक (ग्रामीण) कार्यालयात नेमणूक केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे तर शिर्डी येथील ग्रोवर शेअरच्या घोटाळ्यात तत्कालीन एसपी सोमनाथ घार्गे यांनी एक पोलीस उपनिरीक्षका बापूसह चौघांना निलंबित केले होते. त्यापैकी तिन्ही खंडणीखोर कर्मचाऱ्यांना श्रीरामपूर एमआयडीसी येथे नेमणूक देण्यात आली आहे. तसेच तत्कालीन पोलीस अधीक्षक सुनील कडासने यांनी ज्याच्यावर दरोड्याचा गुन्हा दाखल केला होता, त्या कर्मचाऱ्याची वर्णी सायबर कक्षातून थेट एलसीबीत लावल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. दरम्यान, श्रीरामपूर येथे वादग्रस्त ठरलेले आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्या प्रकरणातील गुन्हा दाखल झालेल्या कर्मचाऱ्याची पुन्हा श्रीरामपूरमध्ये वर्णी लागल्याने अनेकांनी या गॅजेटविषयी प्रश्न उपस्थित केले आहेत. विशेष म्हणजे या गॅजेटमध्ये तब्बल आठ ते दहा कर्मचारी हे लाचखोरीच्या आरोपांमध्ये अडकलेले असताना यांचा मुख्यालयातील कार्यकाळ पाहता त्यांना पुन्हा पोलीस ठाण्यात काम करण्याची संधी दिली, हा प्रकार पोलीस अधीक्षकांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरत आहे.

पोलीस कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्या करण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्याकडून विनंती अर्ज मागविण्यात आले होते. या अर्जामध्ये कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी जाणून त्यांना नेमणुका दिल्या जातात. परंतु या बदल्यांमध्ये पारदर्शकता नसल्याचे स्पष्ट होत आहे. अनेक कर्मचाऱ्यांना त्यामध्ये डावलल्याने हा निर्णय नेमका कशासाठी घेतला असा प्रश्न कर्मचाऱ्यांमधून उपस्थित केला जात आहे. ज्या कर्मचाऱ्यांवर अनेक आरोप आहेत अशा कर्मचाऱ्यांना विनंतीच्या नावाखाली सोयीचे (क्रीम) पोलीस ठाणे देण्यात आले. मात्र तीन–चार वर्ष अद्यापही मुख्यालयातच कामकाज पाहत आहेत, त्यांना पोलीस ठाणे दिले नाही. शिवाय निलंबनाच्या कारवाईनंतर मुख्यालयात नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांना अवघ्या सहा महिन्यांतच पुन्हा पोलीस ठाण्यात नेमणूक दिली असल्याने बदल्यांमागचे गौडबंगाल काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### वमने साहेब, थोरात साहेब वादग्रस्त कर्मचाऱ्यांपासून सावधान!

**हप्तेखोरी आणि लाचखोरीचा आरोप असलेल्या कर्मचाऱ्यांपासून आपल्याला सावधानता बाळगावी लागेल. त्यांच्या विरोधात नागरीकही आवाज उठवू शकतात. त्यामुळे त्यांच्यापासून आपल्याला खबरदारी घेणे आवश्यक आहे, अन्यथा भविष्यात अशा नेमणुकांमुळे आपणही अडचणीत येणार नाही याची आपल्याला काळजी घ्यावी लागेल हे मात्र नक्की.**

# रुग्णवाहिका नाकारल्याने चिमुरड्यांचा मृत्यू?

**दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची खा. नीलेश लंके यांची मागणी । लोणीव्यंकनाथ प्रकरणात श्रीगोंदा पोलिसांकडे तक्रार । वैद्यकीय अधिकारी, प्रशासन आणि पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** लोणीव्यंकनाथ येथील आनंदी अनिल कांडेकर व विरा प्रविण कांडेकर या दोन चिमुरड्यांना वेळेत रुग्णवाहिका उपलब्ध करून न दिल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप करत संबंधित वैद्यकीय अधिकारी आणि अन्य जबाबदार व्यक्तींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी केली आहे. याबाबत त्यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार अर्ज दिला आहे.

रविवारी खासदार लंके यांनी लोणीव्यंकनाथ येथे जाऊन कांडेकर कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. त्यानंतर त्यांनी थेट श्रीगोंदा पोलीस ठाणे गाठून वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत मुळे, डॉ. शैला डांगे तसेच या प्रकरणातील इतर जबाबदार व्यक्तींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. यावेळी बाबासाहेब भोस, बाळासाहेब नाहाटा, टिळक भोस, स्मितल वाबळे, प्रा. संजय लाकुडझोडे, सतीश बोरुडे, बाळासाहेब जठार आणि झहीर जकाते उपस्थित होते.

या प्रकरणाबाबत खासदार लंके यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी बाबासाहेब नागरगोजे आणि पोलिस ■ पान ४ वर

# सराईत चोराकडून पाच मोटारसायकली हस्तगत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शहर आणि परिसरातून दुचाकी चोरी करणाऱ्या सराईत आरोपीला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. किशोर जयसिंग पठारे (वय ४५, रा. पिंपळगाव माळवी, ता. जि. अहिल्यानगर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून १ लाख ५५ हजार रुपये किमतीच्या एकूण ५ चोरीच्या मोटार सायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत.

पाईपलाईन रोडवरील एकविरा चौक येथून शशिकांत गलबले यांची मोटार सायकल ( १६ ७५५२) अज्ञात चोरट्याने लांबवली होती. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन ■ पान ४ वर

# सत्तेतील आमदार असलात तरी लोकहितासाठी वेळप्रसंगी प्रशासनाविरोधात आंदोलन करा

**डॉ. सुजय विखे पाटील यांचा आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांना सल्ला**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**नेवासा–** अधिकारी जनतेची कामे वेळेत करत नसतील, तर सत्ताधारी पक्षाचे आमदार असले तरी लोकहितासाठी वेळप्रसंगी प्रशासनाविरोधात आंदोलन करण्यास घाबरू नये, असा स्पष्ट सल्ला भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी नेवासाचे आमदार विठ्ठलराव लंघे यांना दिला. सत्ता आणि पदापेक्षा जनता मोठी असून, लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी हे जनतेच्या प्रश्नांसाठी लढण्यासाठीच असतात, असे प्रतिपादन त्यांनी केले.

नेवासा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिर अभियानाचा शुभारंभ यावेळी मान्यवरांचा उपस्थितीत करण्यात आला. त्या आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. विखे पाटील म्हणाले, अधिकारी काम करत नसतील, तर आंदोलन करा. तुम्ही सत्तेत असलात, महायुतीचे आमदार असलात तरी लोकांच्या प्रश्नांसाठी आंदोलन करण्यास मागे–पुढे पाहू नका. तुम्ही आंदोलन केले तर मी स्वतः तुमच्यासोबत येईन. माझे वडील पालकमंत्री असले तरी मी जनतेच्या प्रश्नांसाठी आंदोलनात सहभागी होईन. प्रशासनाने कोणत्याही दबावाला बळी न पडता प्रामाणिकपणे जनतेची कामे करावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.यावेळी नगराध्यक्ष करण घुले तसेच शासकीय अधिकारी महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अधिकाऱ्यांना उद्देशून ■ पान ४ वर

# कारवाई झाली, पण माहिती कुठे? उत्पादन शुल्क विभागाच्या मौनामुळे वाढल्या शंका

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**





(छाया : विशाल लोंढे)

**कोपरगाव–** कोपरगाव शहरातील खाटीक गल्लीत शहर पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईत अवैध विदेशी दारूचा साठा जप्त झाला आणि एका आरोपीला अटक करण्यात आली. मात्र या कारवाईपेक्षाही सध्या अधिक चर्चा होत आहे ती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भूमिकेची. कारण ज्या विभागावर अवैध दारूविक्री रोखण्याची प्राथमिक जबाबदारी आहे, त्याच विभागाकडून कारवाईबाबत सातत्याने स्पष्ट माहिती समोर येत नसल्याची तक्रार व्यक्त केली जात आहे.

२५ जुलैच्या रात्री शहर पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे काही तासांत छापा टाकून कारवाई केली. आरोपीला अटक करण्यात आली, गुन्हा दाखल झाला आणि जप्तीचा तपशीलही पोलिसांनी स्पष्ट केला. त्यामुळे कारवाईची संपूर्ण माहिती नागरिकांसमोर आली.

दुसरीकडे, यापूर्वी कोपरगाव व कोळपेवाडी परिसरात राज्य उत्पादन शुल्क विभागाने धाडसत्र राबवल्याचे सांगण्यात आले होते. मात्र त्या कारवायांमध्ये नेमकी किती दारू जप्त झाली, किती आरोपींवर गुन्हे दाखल झाले, किती प्रकरणांचा तपास सुरू आहे आणि किती प्रकरणे न्यायालयात पोहोचली, याची अधिकृत माहिती अद्याप उपलब्ध झालेली नाही.

पत्रकारांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे माहितीची विचारणा केली असता, ''श्रीरामपूर कार्यालयात या'' असे उत्तर देण्यात आल्याची चर्चा आहे. माहिती अधिकार कायदा हा वेगळा विषय असला तरी, सार्वजनिक हिताच्या कारवायांबाबत मूलभूत माहिती देण्याबाबत अनुत्सुकता का दिसते, असा प्रश्न उपस्थित होत आहे. आषाढी एकादशीच्या ड्राय डे दिवशी शहरात अवैध दारूची विक्री सुरू असल्याचे पोलिसांच्या कारवाईतून समोर आल्याने, उत्पादन शुल्क विभागाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांची परिणामकारकता तपासण्याची गरज असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

सध्या या संपूर्ण प्रकरणात सर्वाधिक गरज आहे ती पारदर्शकतेची. उत्पादन शुल्क विभागाने आतापर्यंत केलेल्या सर्व कारवायांचा अधिकृत तपशील जाहीर केल्यास अनेक शंकांना पूर्णविराम मिळू शकतो. अन्यथा, माहितीच्या अभावामुळे विविध तर्क–वितर्कांना खतपाणी मिळत राहील. आता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेऊन विभागाच्या कामकाजाचा आढावा घ्यावा, कारवायांची माहिती नियमितपणे सार्वजनिक करावी आणि अवैध दारूविरोधातील मोहिम अधिक प्रभावी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# नवीन नेहरू मार्केटला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्यापारी संकुल' नामकरणाची मागणी

**घरपट्टीचा ड वर्ग महापालिकांच्या धर्तीवर फेरआढावा घेऊन सुधारित पद्धतीने अंमलबजावणी करावी । नगरसेविका मयुरी जाधव यांचे महापौर ज्योतीताई गाडे यांना निवेदन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेमार्फत चितळे रोड येथे नव्याने विकसित होत असलेल्या नेहरू मार्केट (भाजी मंडई व व्यापारी संकुल) या इमारतीस ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्यापारी संकुल'' असे नामकरण करण्यात यावे, तसेच शहरात लागू करण्यात आलेल्या घरपट्टीबाबत राज्यातील ड वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील घरपट्टीचा अभ्यास करून सुधारित पद्धतीने अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका मयुरी जाधव यांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नगरसेविका मयुरी जाधव यांनी म्हटले आहे की, चितळे रोडवरील नव्याने विकसित होत असलेल्या नेहरू मार्केट (भाजी मंडई व व्यापारी संकुल) या महत्त्वपूर्ण इमारतीस ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्यापारी संकुल'' असे नाव देण्यात यावे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील आदर्श, न्यायप्रिय, लोककल्याणकारी आणि दूरदृष्टीच्या राज्यकर्त्या म्हणून संपूर्ण देशात गौरविल्या जातात. त्यांचा जन्म अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी येथे झाला असून त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून पूर्वीचा अहमदनगर जिल्हा आज अहिल्यानगर या नावाने ओळखला जात आहे. हा जिल्ह्याच्या इतिहासातील अभिमानास्पद आणि महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

त्यांनी पुढे नमूद केले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कारकिर्दीत मंदिरे, घाट, विहिरी, धर्मशाळा, रस्ते तसेच व्यापारी आणि सामाजिक विकासासाठी अनेक उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्या लोककल्याणकारी विचारांचा आणि विकासदृष्टीचा वारसा आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळ ■ पान ४ वर

# माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त ठाकरे शिवसेनेचे मोफत रक्त चाचणी शिबिर उत्साहात

**नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त अहिल्यानगर शहर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले मोफत व सवलतीच्या दरातील रक्त चाचणी शिबिर सोमवारी उत्साहात पार पडले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून मोठ्या संख्येने नागरिकांनी विविध रक्त चाचण्यांचा लाभ घेतला.

मेट्रोपोलिस हेल्थकेअर लिमिटेड (मेट्रोपोलिस लॅब) यांच्या तांत्रिक सहकार्याने भिस्तबाग चौक, सावेडी येथील मेट्रोपोलिस लॅबमध्ये सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरामध्ये थायरॉईड (), कोलेस्टेरॉल यांच्या चाचणी मोफत करण्यात आल्या. तर शुगर (), बॉडी व्हायटल पॅकेज या चाचण्या अत्यल्प दरात करण्यात आल्या. तसेच इतर विविध रक्त चाचण्यांवर ५० ते ६५ टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात आली होती. १२५ हून नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

यावेळी बोलताना अहिल्यानगर महानगर प्रमुख किरण काळे म्हणाले, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी नेहमीच राजकारणा बरोबर समाजकारणाला प्राधान्य दिले आहे. सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक हित लक्षात घेऊन समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची प्रेरणा आम्हाला त्यांच्याकडून मिळते. त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे जनतेच्या हिताचा उपक्रम राबविणे. पुढील काळातही ठाकरे ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### नेप्तीत आषाढी एकादशीनिमित्त महाभिषेक, महाआरती, खिचडीचे वाटप



अहिल्यानगर- नगर तालुक्यातील नेप्ती येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आषाढी एकादशीनिमित्त अत्यंत भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. सकाळपासून मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. औटी कुटुंबीयांच्या वतीने श्री विठ्ठल- रुक्मिणीचा विधिवत महाभिषेक करण्यात आला. अभिजीत औटी यांच्या हस्ते पांडुरंगाची महाआरती करण्यात आली . हरिनामाचा गजर आणि भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामस्थांनी चांगल्या पावसासाठी पांडुरंगाला साकडे घातले अशी माहिती रामदास फुले यांनी दिली. दरवर्षीप्रमाणे यंदाही औटी कुटुंबीयांनी खिचडीचे व केळाचे वाटप करून सामाजिक बांधिलकीची परंपरा कायम राखली. अभिजीत औटी व नारायण औटी यांच्या हस्ते भाविकांना फळे व खिचडीचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमानिमित्त मंदिर परिसरात विठ्ठल नामाचा अखंड गजर सुरू होता. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी विठ्ठल-रुक्मिणींचे दर्शन घेऊन कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. औटी कुटुंबीयांनी अनेक वर्षांपासून सातत्याने सुरू ठेवलेल्या या सेवाभावी उपक्रमामुळे परिसरातील नागरिक आणि वारकरी भक्तांमध्ये विशेष समाधानाचे वातावरण निर्माण झाले. धार्मिक परंपरा, समाजसेवा आणि भक्ती यांचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. आषाढी एकादशी हा केवळ धार्मिक सण नसून समाजाला एकत्र आणणारा आणि सेवाभावाची प्रेरणा देणारा दिवस आहे. विठ्ठलभक्ती म्हणजे केवळ पूजा-अर्चा नव्हे, तर गरजूंना मदतीचा हात देणे, समाजात बंधुभाव वाढविणे आणि आपल्या संस्कृतीच्या परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. औटी कुटुंबीय अनेक वर्षांपासून ही सेवा अखंडपणे करत असून भविष्यातही हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा आमचा प्रयत्न राहील. विठ्ठल भक्ती म्हणजे समाजात बंधुभाव वाढवणे असे प्रतिपादन अभिजीत औटी यांनी केले. ते पुढे म्हणाले, मंदिर हे केवळ श्रद्धेचे केंद्र नसून सामाजिक ऐक्याचेही प्रतीक आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने भाविकांना महाप्रसाद, फळांचे वाटप आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून विठ्ठलभक्तीची परंपरा अधिक बळकट करण्याचा आमचा प्रयत्न आहे. युवकांनीही अशा धार्मिक व सामाजिक उपक्रमांत सहभागी होऊन संस्कृती संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, हीच अपेक्षा आहे. प्रत्येकाने आपल्या परीने योगदान देणे ही काळाची गरज आहे.

## श्रमिकनगर परिसर दणाणला बाल वारकऱ्यांच्या दिंडीने

**। वारकरी वेशातील विद्यार्थ्यांनी वेधले लक्ष**
**। पालकांना रोपांचे वाटप करून दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय प्राथमिक, माध्यमिक व बालक मंदिर विद्यालयाच्या वतीने भिस्तबाग परिसरात भव्य बाल वारकरी दिंडी सोहळा उत्साहात पार पडला. विठ्ठल नामाच्या अखंड गजरात, टाळ-मृदुंगाच्या निनादात, लेझीम आणि ढोल पथकाच्या दणदणाटात निघालेल्या या दिंडीने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. यंदाच्या दिंडीचे वैशिष्ट्य म्हणजे भक्तीसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पालकांना रोपांचे वाटप करण्यात आले.

दिंडीची सुरुवात सकाळी नऊ वाजता विद्यालयाच्या प्रांगणात विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. संस्थेचे विश्वस्त राजेंद्र म्याना आणि सौ. स्मिता म्याना यांच्या हस्ते पूजन संपन्न झाले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अशोक सब्बन, नगरसेवक मनोज दुलम, प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष शंकर येमूल, श्रमिक जनता हौसिंग सोसायटीचे चेअरमन विलास सग्गम, माजी मुख्याध्यापिका विद्या दगडे, सेवानिवृत्त शिक्षिका सौ. भारती गाडेकर, माध्यमिकचे मुख्याध्यापक शशिकांत गोरे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सुलभा सुरकुटला तसेच मान्यवर उपस्थित होते.

दिंडीच्या अग्रभागी सजविलेल्या पालखीसमोर विद्यार्थ्यांनी लेझीमचे आकर्षक डाव सादर केले. टाळ, मृदुंग, वीणा आणि भगवे ध्वज हातात घेऊन बाल वारकरी ''विठ्ठल विठ्ठल... विठ्ठला हरी ओम विठ्ठला...'', ''ज्ञानबा-तुकाराम...'', ''माऊली... माऊली...'' अशा भक्तिगीतांच्या तालावर तल्लीन झाले होते. त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे परिसरात भक्तिरसाची अनुभूती निर्माण झाली.

यंदाच्या दिंडीतील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांनी काढलेली भव्य ग्रंथदिंडी. संत साहित्य, ज्ञानपरंपरा आणि वाचन संस्कृतीचा संदेश देणाऱ्या या ग्रंथदिंडीचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. विद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी रांगोळीच्या माध्यमातून विठ्ठल-रुक्मिणीचे सुंदर चित्र साकारले होते.

बालवाडीपासून दहावीपर्यंतचे सर्व विद्यार्थी दिंडीत सहभागी झाले होते. मुलांनी वारकरी संप्रदायाचा पारंपरिक पोशाख परिधान केला होता, तर विद्यार्थिनींनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन सहभाग नोंदविला. विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, मुक्ताबाई, मीराबाई, श्रीकृष्ण आणि राजमाता जिजाऊ यांच्या वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी दिंडीचे विशेष आकर्षण ठरवत उपस्थितांची मने जिंकली.

श्रमिकनगर येथील बालाजी मंदिरासमोर विद्यार्थ्यांनी पारंपरिक रिंगण सोहळा सादर केला. या प्रसंगी विद्यार्थिनी आणि शिक्षिकांनी फुगड्यांचा फेर धरत वारकरी परंपरेतील सांस्कृतिक वारसा जपला. दिंडी मार्गावरील विविध चौकांमध्ये पालखीचे स्वागत करण्यात आले. लहानग्या वारकऱ्यांचा उत्साह पाहण्यासाठी नागरिक आणि पालकांनी मोठी गर्दी केली होती.

## सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये आषाढी एकादशी उत्साहात साजरी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल तारकपूर येथे रोजी आषाढी एकादशीनिमित्त भक्तिमय तसेच प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन, आरती आणि दिंडी मिरवणुकीने झाली. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत टाळ-मृदुंगाच्या गजरात ''ज्ञानोबा-तुकाराम''चा जयघोष करत संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून टाकला.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी ''पाणी अडवा, पाणी जिरवा पाणी वाचवा'' या सामाजिक संदेशावर आधारित प्रभावी भारूड सादर केले. या सादरीकरणातून पाण्याचे महत्त्व, वाढती पाणीटंचाई आणि पाणी जपून वापरण्याची गरज याबाबत जनजागृती करण्यात आली. उपस्थित पालक व मान्यवरांनी या सादरीकरणाला उत्स्फूर्त दाद दिली.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरलेले ''विठ्ठल भक्त कुर्मदास'' या विषयावरील लघुनाट्य विद्यार्थ्यांनी अत्यंत भावपूर्ण पद्धतीने सादर केले. शारीरिक अडचणी असूनही पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी निघालेल्या कुर्मदासांची अढळ श्रद्धा, नामस्मरण आणि अखंड भक्ती यांचे प्रभावी चित्रण या नाटिकेत करण्यात आले. अखेरीस भगवान विठ्ठल स्वतः आपल्या भक्ताच्या भेटीस येतात, हा प्रसंग पाहून उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. या नाटिकेतून ''देवाला बाह्य रूप नव्हे, तर खरी भक्ती आणि शुद्ध मन महत्त्वाचे असते'' हा संदेश विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे पोहोचवला.

यावेळी पूर्व प्राथमिक विभागातील चिमुकल्यांनी विठ्ठलभक्तीवर आधारित भक्तिगीत सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले, तर हायस्कूल विभागातील विद्यार्थ्यांनी पारंपरिक लेझीमचे दमदार सादरीकरण करून कार्यक्रमात उत्साह आणि जोश निर्माण केला. या दोन्ही सादरीकरणांना उपस्थितांकडून भरभरून दाद मिळाली.

संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सौ. प्रीती कटारिया, सौ. आशा रंगलानी, सौ. करिश्मा नवलानी, सौ. भावना भालेराव तसेच इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहपूर्ण आणि नेटकेपणाने केले. याशिवाय विद्यार्थ्यांनी भक्तिगीते, नृत्य आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंती निमित्त समानतेवर आधारित जनजागृती करत, इयत्ता चौथीच्या विद्यार्थांनी तयार केलेले पोस्टर्स या दिंडी मध्ये विद्यार्थांनी प्रदर्शित केलीत.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री राम मेघांनी म्हणाले की आज आपण सर्वजण अत्यंत उत्साहाने आणि भक्तिभावाने दिंडी कार्यक्रमासाठी येथे एकत्र आलो आहोत. महाराष्ट्राची संत परंपरा ही आपली अमूल्य परंपरा आहे. संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज यांसारख्या महान संतांनी आपल्याला भक्ती, समता आणि प्रेमाचा मार्ग दाखवला.

## व्यसनामुळे केवळ व्यक्तीचेच नव्हे, तर संपूर्ण कुटुंब आणि समाजाचेही मोठे नुकसान -जिल्हा न्यायाधीश आर. डी. चव्हाण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल घडविण्यासाठी शिक्षणाबरोबरच चांगले संस्कार, कायद्याचे ज्ञान आणि व्यसनमुक्त जीवनशैली तितकीच महत्त्वाची आहे. व्यसनामुळे केवळ व्यक्तीचेच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाचे आणि समाजाचेही मोठे नुकसान होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या अमली पदार्थांपासून आणि व्यसनांपासून कायम दूर राहून वाचन, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम आणि सकारात्मक छंदांचा अंगीकार करावा, असे आवाहन जिल्हा न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश आर. डी. चव्हाण यांनी केले.

भिंगार येथील श्रीमती अॅबट मायादेवी गुरुदित्ताशाह हायस्कूल येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कायदे विषयक जनजागृती कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



यावेळी व्यासपीठावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रशिक्षित मध्यस्थ तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अॅड. अनिल सरोदे, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण समितीचे सचिव अॅड. साहेबराव चौधरी, सामाजिक कार्यकर्ते संजय सपकाळ, प्राचार्य प्रमोद तोरणे, प्रभारी मुख्याध्यापक नारायण अनभुले, पर्यवेक्षिका कविता शिंदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

पुढे न्यायाधीश आर. डी. चव्हाण म्हणाले की, ''विद्यार्थीदशा ही आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची आणि संवेदनशील अवस्था आहे. याच काळात व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असते. शाळा विद्यार्थ्यांना चांगले संस्कार देते, मात्र चुकीच्या संगतीमुळे अनेक विद्यार्थी व्यसनाच्या आहारी जातात. एकदा व्यसनाची सवय लागल्यानंतर त्यातून बाहेर पडणे अत्यंत कठीण असते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने चांगल्या मित्रांची निवड करावी, सकारात्मक विचार ठेवावेत आणि वेळेचा सदुपयोग करावा.''

यावेळी अॅड. अनिल सरोदे यांनी विद्यार्थ्यांना पोक्सो () कायद्याविषयी सविस्तर माहिती दिली. बालकांच्या संरक्षणासाठी हा कायदा किती महत्त्वाचा आहे, याबाबत त्यांनी उदाहरणांसह मार्गदर्शन केले. ते म्हणाले, ''कोणत्याही प्रकारचा शारीरिक, मानसिक किंवा लैंगिक अत्याचार सहन करू नका. अशा घटना घडल्यास भीती न बाळगता पालक, शिक्षक किंवा विश्वासू व्यक्तीला त्वरित माहिती द्या. गुन्हेगारांना कायद्याने कठोर शिक्षा होते. त्यामुळे अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे ही प्रत्येक बालकाची जबाबदारी आहे.

## पाटेगाव मुंगी फाट्यावर शाळकरी विद्यार्थ्यांसमोरच कथित 'चक्री' जुगार; कारवाईची मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** पैठण शहरापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावरील पाटेगाव येथील जिल्हा परिषद शाळा व कौशल्य विद्यालयातील विद्यार्थी दररोज मुंगी फाटा येथे वाहनाची वाट पाहण्यासाठी उभे राहत असतात. मात्र, नेमक्या याच ठिकाणी कथितपणे 'चक्री' जुगार सुरू असल्याची चर्चा असून, त्यामुळे पालक, नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, आयटीआय कॉलेजसमोरील परिसरात काही व्यक्ती उघडपणे चक्री जुगार खेळत असल्याचे दिसून येते. शाळकरी विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर या मार्गावर ये-जा होत असल्याने त्यांच्या मनावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच या प्रकारामुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या कथित जुगार अड्ड्यावर पोलिसांनी तातडीने छापा टाकून वस्तुस्थितीची पडताळणी करावी आणि अवैध प्रकार सुरू असल्यास कठोर कारवाई करून तो कायमस्वरूपी बंद करावा, अशी मागणी नागरिक, पालक आणि शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

## बालकांच्या निरोगी भविष्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल स्तुत्य उपक्रम

**मोफत बालरोग तपासणी शिबिराला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; असंख्य घेतला तज्ज्ञ उपचारांचा लाभ**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आनंदऋषीजी हॉस्पिटल अॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले मोफत बालरोग तपासणी शिबिरात ७२ बालकांची मोफत तपासणी करण्यात आली . या शिबिराला शहरासह ग्रामीण भागातील पालकांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला. आपल्या पाल्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आलेल्या पालकांनी तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून घेतली. बालकांच्या विविध आरोग्यविषयक समस्यांचे निदान, आवश्यक उपचार, आहार, लसीकरण, वाढ व विकास याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या समाजोपयोगी उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना दर्जेदार वैद्यकीय सेवेचा लाभ विनामूल्य मिळाल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले.

शिबिराचे उद्घाटन डॉ निखिलकुमार गुट्टे यांच्याहस्ते करण्यात आले यावेळी डॉ. प्रकाश कांकरिया , प्रकाश छल्लाणी , डॉ वसंत कटारिया ,अभय गुगळे, माणकचंद कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा ,डॉ. आशिष भंडारी यांची प्रमुख उपस्थिती होती तर शिबिरामध्ये डॉ. निखिलकुमार गुट्टे (नवजात शिशु व बालरोग तज्ज्ञ), डॉ. सचिन तोडमल (बालरोग तज्ज्ञ), डॉ. रुपेश सिकची (पीडियाट्रिक सर्जन), डॉ. वैभवी वंजारे (बालरोग तज्ज्ञ) आणि डॉ. दीपी अग्रवाल (बालरोग तज्ज्ञ) आदी उपस्थित होते

प्रास्तविक डॉ आशिष भंडारी म्हणाले की, एखाद्या समाजाचा विकास हा त्या समाजातील बालकांच्या आरोग्यावर अवलंबून असतो. निरोगी बालक हे सुदृढ राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत. त्यामुळे प्रत्येक पालकाने आपल्या मुलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. आज अनेक गंभीर आजार योग्य वेळी निदान झाल्यास पूर्णपणे बरे होऊ शकतात. त्यामुळे नियमित आरोग्य तपासणी, वेळेवर लसीकरण, योग्य आहार आणि तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यंत आवश्यक आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलने आयोजित केलेले हे शिबिर म्हणजे समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण असून अशा उपक्रमांमुळे हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.आधुनिक वैद्यकीय सुविधा केवळ मोठ्या शहरांपुरत्या मर्यादित न राहता सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे ही काळाची गरज आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलने अत्याधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी डॉक्टर आणि सेवाभावी दृष्टिकोन यांच्या माध्यमातून आरोग्यसेवेचा एक आदर्श निर्माण केला आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही दर्जेदार उपचार मिळावेत, या उद्देशाने रुग्णालय सातत्याने कार्य करत आहे. भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांमधून अधिकाधिक नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी बोलताना डॉ. निखिलकुमार गुट्टे म्हणाले कि शिबिरादरम्यान रुग्णालयातील अत्याधुनिक सुविधांची माहितीही उपस्थितांना देण्यात आली. २६ बेडचे सुसज्ज एन.आय.सी.यू., नवजात बालकांच्या श्वासोच्छवासाच्या त्रासावरील उपचार, बालदमा, ए.आर.डी.एस., नवजात कावीळीसाठी फोटोथेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, अनुवंशिक तसेच जन्मजात आजारांचे निदान, बालकांचे टू-डी इको, एक्स-रे, अत्याधुनिक पॅथॉलॉजी लॅब, २४ तास उपलब्ध तज्ज्ञ डॉक्टर आणि महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत शस्त्रक्रियांची सुविधा याबाबत पालकांना सविस्तर माहिती देण्यात आली. अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मशिन्सच्या साहाय्याने अचूक निदान व उपचार केले जात असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

## शब्दकोडे क्रमांक : १५



**आडवे शब्द :** १.आराम ३.निरोप ७.माहिती ९.उपवास ११.वतन राखणारा १४.कणीस १६.दैना १७.हात १८.ताकद १९.रत्न २२.भंगार विकत घेणारा २५.एक शौर्य गीताचा प्रकार २६ सतत हसणारा २८.एक चतुर्थांश हिस्सा २९.एक जलाशयाचा प्रकार ३१.प्रजा ३४.पर्ण ३५.मोर्चा ३७.खोटा आव ३९.एक पेय ४०.सर्प ३८.उचलण्यास भारी ४१.रिकामा ४३.दंगा ४५.गडबड ४७.पुरस्कार ५०.हत्या ५१.निश्चय ५२.जास्तीत जास्त मर्यादा ५४.समुद्र ५५.विनाकारण

**उभे शब्द** : १.आराम २.जलद गतीने ४.परमेश्वर ५.फलंदाजाने काढलेल्या 100 धावा ६.नराची जोडीदार ८.गरज १० तृष्णा १२.स्वर्ग-विरुद्ध १३.दुधापासून बनवण्यात आलेल्या पदार्थ १५.लमाणांचा तांडा २०.मार,फटका २१. निवाळा २३.बातमी २४.धुळीपासून उठलेला लोट २५.मुलगी २६.वारा २७.नरेश ३०.इंग्रजीत-नशीब ३२.संगम ३३.दयनीय अवस्था ३४.दादर ३५.सणसणीत हाणलेली चापटी ३६. वण ३७.पहा ३८.जड ४२.मनाची दोलायमान अवस्था ४४.उष्णता मोजण्याचे एक यंत्र ४६.न घाबरता थेट ४७.हिस्सा ४९ तुकडी ५१.एक फुल हिंदीत ५३.पत्र

**शब्दकोडे क्रमांक : १४ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | यो | ग | शा | ळा | | बे | ता | ब | | र | फु |
| का | | डा | स | | ला | डू | | डा | ग | | क |
| र | त | | न | भ | | क | प | | रा | क | ट |
| | ला | ल | | ड | क | | र | ब | | र | |
| च | व | | टो | क | | पा | त | | त | वं | ग |
| ल | | पा | प | | अ | ट | | स | न | द | |
| न | व | ल | | झी | ल | | न | | द | | भू |
| | का | क | वी | | गा | जा | वा | जा | | स | पा |
| ते | ल | | त | फा | व | त | | न | र | ब | ळी |
| | त | डा | | ल | | पा | डा | व | | ळ | |
| खे | | क | र | क | री | त | | र | वी | | झो |
| प | त | | या | | घ | | की | | ट | र | का |


आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### गुरु लीलामृत ग्रंथपठनाने आत्मिक शांतता - देवरे गुरुजी स्वामी समर्थ



अहिल्यानगर- श्री गुरुचरित्र आणि श्री गुरु लीलामृत दोन्ही ग्रंथ दत्त संप्रदायात अत्यंत पवित्र, दिव्य आणि चमत्कारिक मानले जातात. या ग्रंथपठणाने भक्तांना संकट निवारणाबरोबरच असाध्य रोग, मानसिक आजार, शारीरिक व्याधी नष्ट होऊन नकारात्मकतेचा नाश होऊन मनोरथ पूर्ती होते.या ग्रंथाचे चिंतन, मनन केल्याने विचलित झालेले चित्त स्थिर होते आणि आत्मिक शांतता लाभते. असे प्रतिपादन निखिल देवरे गुरुजी यांनी केले. सावेडी उपनगरातील गुलमोरोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सवास प्रारंभ झाला सामुदायिक गुरु लीलामृत पारायण सोहळ्यास महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. दिनांक २६, २७, २८ जुलै या तीन दिवशी हा पारायण सोहळा रोज दुपारी १ ते ४ या वेळेत होणार आहे. बुधवार दिनांक २९ जुलै रोजी गुरु पौर्णिमेला श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दिव्य वस्तूंचा दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या वापरातील दिव्यमणी, गळ्यातील माळ, पादुका, कानातील - गळ्यातील रुद्राक्ष, नित्य पूजेतील दिव्य शिवलिंग, अन्नपूर्णा माता शंख, रिद्धी सिद्धी कवड्या, महाराजांनी वापरलेली कस्तुरी उटी, दिव्य वाचनातील गुरुचरित्र ग्रंथ, दत्त महाराजांचा पवित्र शंख आदि वस्तूंचे दर्शन भाविकांना घेता येईल. तरी गुरुपौर्णिमेला सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत गुरूंच्या या दिव्य वस्तू दर्शन सोहळ्याचा लाभ भाविकांनी घ्यावा.असे आवाहन मंदिराच्या वतीने करण्यात आले आहे.

### पंचमदा फॅन्स फौंडेशनतर्फे ३१ जुलैला 'यादे रफी' गीत मैफिल

अहिल्यानगर - स्वरसम्राट स्व. मोहम्मद रफी यांच्या अजरामर स्वरांची जादू पुन्हा एकदा रसिकांना अनुभवता यावी, त्यांच्या सदाबहार गीतांना संगीतमय मानवंदना देता यावी, यासाठी पंचमदा फॅन्स फौंडेशनच्या वतीने मोहम्मद रफी यांच्या ४६ व्या पुण्यतिथीनिमित्त शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ रोजी 'यादे रफी' या विशेष गीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. सावेडी येथील माऊली सभागृहात सायंकाळी ६.३० वाजता ही सुरेल मैफिल रंगणार असून, रफी यांच्या गाजलेल्या चित्रपट गीतांचा बहारदार नजराणा रसिकांना अनुभवता येणार आहे. 'झी सा रे ग म प' फेम गायक रफी हबीब, कु. भाग्यश्री डुंभरे, संदीप भुसे आणि डॉ. सत्तार सय्यद हे आपल्या सुमधुर आवाजातून स्व. मोहम्मद रफी यांच्या लोकप्रिय गीतांची मेजवानी रसिकांसमोर सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फिनिक्स स्किन केअर हॉस्पिटलचे डॉ. राजीव सूर्यवंशी करणार आहेत. अहिल्यानगरमधील स्थानिक कलाकारांसोबत पुणे येथील कलाकारांचाही सहभाग असल्याने या मैफिलीला विशेष रंगत येणार आहे. स्व. मोहम्मद रफी यांनी आपल्या जादुई आवाजाने हिंदी चित्रपटसृष्टीला असंख्य अजरामर गीते दिली. प्रेमगीत, विरहगीत, भक्तिगीत, भावगीत, देशभक्तिपर गीत अशा विविध भावछटांनी नटलेल्या त्यांच्या गीतांनी अनेक पिढ्यांच्या मनावर अधिराज्य गाजविले.

### चंद्रभान लगड यांचे निधन

अहिल्यानगर - जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक



बीडचे सेवानिवृत्त शाखा अधिकारी चंद्रभान रामभाऊ लगड (वय ८६) यांचे रविवारी (दि.२६ जुलै) सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचा अंत्यविधी दुपारी ३:०० वाजता हिवरा (तालुका आष्टी) येथे झाला. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. ज्येष्ठ पत्रकार अनिल लगड यांचे ते वडील होते.

### सभद्राबाई शिंदे यांचे निधन

अहिल्यानगर - नगर-कल्याण रोडवरील सुभद्राबाई



लिंबाजी शिंदे (वय ९२) यांचे रविवारी (दि.२६ जुलै) रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. धार्मिक व मनमिळावू स्वभावामुळे ते सर्वांना सुपरिचित होत्या. त्यांच्या पश्चात दोन मूले- मुलगी, सुना नातवंड असा परिवार आहे. रविवारी नालेगाव अमरधाम येथे त्यांचे पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पत्रकार सचिन शिंदे यांच्या त्या आई होत्या.

# महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवद्रजी फडवणीस यांचा वाढदिवस आगळ्या-वेगळ्या पद्धतीने साजरा




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** केडगाव जवळील चास येथे उत्साहात साजरा करण्यात आला चास येथे महिलांचे चार शेतकरी बचतगट आहेत.या बयत गटातील महिलांनी पाणी फाउंडेशन च्या शेती विषयक स्पर्धेमध्ये मध्ये सलग तीन वर्षे आपल्या शेतीविषयी अनुभवाच्या बळावर प्रथम क्रमांक पटकावला आहे.या सगळ्या गटाच्या ४५ महिला अतिशय सुंदर पद्धतीने शेती करीत असुन त्या फवारणीसाठी फवारे व सेंद्रिय खते बनवतात, मूग, सोयाबीन व भाजीपाल्याची शेती करतात त्यांच्या या कार्याच्या सन्मानार्थ असा भाजपा महिला मोर्चाच्या वतीने या शेतकरी महिलांना देवाभाऊच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन शेतीसाठी उपयुक्त असे कृषी किट भाजपा महिला मोर्चाच्या राज्याच्या अध्यक्षा चित्राताई वाघ यांच्या सूचनेनुसार भेटीदाखल देण्यात आले.त्यामध्ये खुरपे,सेंद्रिय खत आणि कृषी पंप,सहा प्रकारची बी बियाणे इत्यादी वस्तू आहेत. कार्यक्रमाच्या सुरवातीला भाजपाच्या महिला मोर्चाच्या राज्याच्या उपाध्यक्षा गीताताई गिल्डा यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत करून कार्यक्रमाची संकल्पना स्पष्ट केली.

आपल्या शेतीच्या संदर्भात असलेल्या सकारात्मक कार्याचा हा सन्मान असुन हळदी कुंकवाचे हे वाण आंही आपणास भेटी दाखल देत आहोत असे सांगुन सर्वाना शुभेच्छा दिल्या. लाभार्थी शेतकरी महिलांनीही देवाभाऊंचे अभिनंदन करून आनंद व्यक्त करत शेतातली पारंपारीक गाणी म्हणून दाखवली. यावेळी उपस्थित कृषी अधिकारी यांनी मार्गदर्शन केले .काही महिलांनी उत्स्फूर्तपणे संवाद साधला ज्यात त्यांनी कशा पद्धतीने शेती केली यातुन मिळणारे उत्पन्न, समाधान येणाऱ्या अनुभवाची माहिती दिली.

खूपच सुंदर पद्धतीने चास ग्रामपंचायत सभागृहात हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. हा उपक्रम यरास्वीतेसाठी ज्योस्ना मुंगी, गयाताई माने, संध्या पावसे, कालिंदी केसकर,नीता गायकवाड, स्वाती शिरसुल, सुरेखा जंगम, रजनी भंडारी, श्वेता धोंड, ज्योती दांडगे, सविता मोरे, विद्या बडवे, पद्मा बोरुडे,अभिजीत बोरुडे,प्रिया जानवे,वंदना गांधी यांचे या कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य लाभले.व भाजपाचे जिल्हाप्रमुख अनिल मोहिते यांचे या कार्यक्रमासाठी मागदर्शन मिळाले.

# सनराईज समाजकार्य महाविद्यालयाचे प्रा. चेतन दिवाण यांची महाराष्ट्र राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणावर निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**श्रीगोंदा–** मानसिक आरोग्य क्षेत्रातील अभ्यास, संशोधन आणि मनोरुग्ण सामाजिक कार्यातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत प्रा. चेतन दिवाण यांची महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत महाराष्ट्र राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरण () वर नियुक्ती करण्यात आली आहे.

ही नियुक्ती त्यांच्या शैक्षणिक उत्कृष्टतेची, व्यावसायिक तज्ज्ञतेची आणि मानसिक आरोग्य क्षेत्रातील दीर्घकालीन कार्याची पोचपावती मानली जात आहे. मानसिक आरोग्य सेवा अधिक प्रभावी, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी त्यांच्या अनुभवाचा मोठा लाभ राज्याला होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



मानसिक आरोग्य सेवा अधिनियम २०१७ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यरत असलेल्या मार्फत राज्यातील मानसिक आरोग्य संस्थांचे नोंदणी व मानकीकरण, रुग्णांच्या हक्कांचे संरक्षण, गुणवत्ता तपासणी, मानसिक आरोग्य व्यावसायिकांचे क्षमता विकास, धोरणांची अंमलबजावणी, कलंक निर्मूलन आणि समुदायाधारित मानसिक आरोग्य सेवा विस्तार अशा महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्या जातात.

प्रा. चेतन दिवाण यांच्या नियुक्तीमुळे राज्यातील मानसिक आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा मिळेल आणि रुग्णकेंद्रित, गुणवत्तापूर्ण सेवा अधिक सक्षमपणे राबवल्या जातील, असा विश्वास विविध स्तरांतून व्यक्त करण्यात येत आहे. प्रा. चेतन दिवाण हे सनराईज समाजकार्य महाविद्यालय श्रीगोंदे येथे प्रभारी संचालक म्हणून कार्यरत आहेत प्रा. चेतन दिवाण यांना त्यांच्या नव्या जबाबदारीसाठी सर्व स्तरांतून अभिनंदन व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# बोल्हेगावच्या स्वामी समर्थ केंद्रात उच्चांकी २७ हजार पारायण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** येथील बोल्हेगाव फाटा परिसरातील स्वामी समर्थ केंद्रात ( दिंडोरी प्रणित) रविवारी ( ता. २६ जुलै) सकाळी ८ ते ११ या वेळेत स्वामी चरित्र या ग्रंथाचे तब्बल २७ हजार पारायण पार पडले. राज्याच्या अध्यात्मिक क्षेत्रातील एकाच दिवसाच्या पारायणाचा हा उच्चांक मानला जातो.



केंद्राचे प्रमुख चंद्रशेखर (काका) लोळगे यांच्या नेतृत्वाखालील टीमने हा अभिनव उपक्रम यशस्वी केला. आज सकाळी सात वाजल्यापासूनच केंद्राकडे येणारे सर्व रस्ते गर्दीने फुलून गेले होते. पारायणासाठी आलेल्या भाविकांसाठी भव्यदिव्य मंडपात प्रशस्त बैठक व मोठी पार्किंग व्यवस्था करण्यात आली होती. सकाळी आठ वाजता एका सेवेकरी जोडप्याच्या हस्ते स्वामी समर्थांची आरती होवून पारायण सोहळ्याला सुरुवात झाली. तीन टप्प्यांमध्ये प्रत्येकी नऊ हजार याप्रमाणे एकंदर २७ हजार पारायण निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात आले. या केंद्राला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने २५ हजार पारायण पूर्ण करण्याचा संकल्प करण्यात आला होता. तथापि, प्रत्यक्षात मात्र हा आकडा २७ हजारांपर्यंत गेला.

पारायण सोहळ्यात सहभागी झालेल्यांमध्ये महिलांची संख्या सर्वाधिक होती. वृद्धांचा उत्साहही वाखाणण्याजोगा होता. शाळकरी मुलेही हिरिरीने सहभागी झाली होती. विशेष म्हणजे तरुण-तरुणींचा पारायण करण्यात तसेच आयोजनाच्या कामातही लक्षणीय सहभाग होता. पारायण सोहळा संपन्न झाल्यानंतर सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. स्थानिक नगरसेवकांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पारायण सोहळ्याला भेट देवून या आयोजनाबद्दल चंद्रशेखर (काका) लोळगे व त्यांच्या सेवेकरी चमुचे कौतुक केले. या पारायण सोहळ्याच्या धर्तीवरच पुढील काळात दुर्गा सप्तशती या ग्रंथाच्या १००८ पारायण सोहळ्याचे आयोजन करणार असल्याचा घोषणा लोळगे यांनी यावेळी केली.

राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनामध्येकथा लेखक

# बाळासाहेब देशमुख जगतगुरु संत तुकाराम महाराज कथाकथनकार पुरस्काराने सन्मानित

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्व पै किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व पै. नाना डोंगरे व्यायाम शाळा, निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित.. राज्यस्तरीय वे०७ ग्रामीण मराठी साहित्य संमेलन, निमगाव वाघा येथे २५ जुलै २०२६ रोजी संपन्न झाले. साहित्य संमेलनाध्यक्षपदी साहित्यिक शंकर अंदानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून माधवराव लामखडे जिल्हा परिषद सदस्य हे होते.



ग्रामीण साहित्य संमेलन मध्ये कथाकथन, कवी संमेलन, विविध क्षेत्रातील मान्यवरांचे पुरस्कार असे कार्यक्रम संपन्न झाले. पुरस्कार विजेत्यांना माननीय माधवराव लामखडे यांच्या शुभहस्ते ट्रॉफी व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

सदर सम्मेलन मध्ये कथाकथनकार श्री बाळासाहेब देशमुख यांना जगदुरु संत तुकाराम महाराज कथाकथनकार पुरस्कार, माननीय माधवराव लामखडे यांच्या शुभहस्ते देण्यात आला. बाळासाहेब देशमुख यांचे आजवर अहिल्यानगर जिल्ह्यात ५०० कथाकथन प्रयोग , शाळा, कॉलेज, ज्येष्ठ नागरिक संघ येथे पूर्ण झालेले आहेत. शिवाय विविध आकाशवाणी केंद्रावर ,१२० कथा प्रसारित झालेल्या आहेत. राज्यस्तरीय साहित्य संमेलनमध्ये त्यांचे आजवर ३३ कथाकथन प्रयोग पूर्ण झालेले आहेत.. रंग माझा वेगळा, माणसे अशी.. अन् तशीही... , माणसं भिंगातून... हे तीन कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत.

सदर सम्मेलन राज्याच्या विविध भागातून साहित्यिक उपस्थित होते. आयोजक नानासाहेब डोंगरे यांना प्रास्ताविक केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते संदीप रासकर यांनी केले. बाळासाहेब देशमुख यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल, ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत पालवे, बाबुराव उपाध्ये ,सदानंद भणगे, इतिहास अभ्यासक नवनाथ वाव्हळ, दिलीप कापसे, रूपचंद शिदोरे , सुरेखा घोलप यांनी अभिनंदन केले आहे.

# जय हरी विठ्ठलाच्या गजरात शहरात लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयाची बाल वारकरी दिंडी उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बाल वारकरी दिंडी सोहळ्याला विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हातात भगवे ध्वज, टाळ-मृदुंगाचा निनाद, "जय हरी विठ्ठल", "ज्ञानोबा-तुकाराम" यांच्या अखंड गजरात शहरातून निघालेल्या या दिंडीने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

बाल वारकऱ्यांनी पारंपरिक वारकरी संप्रदायाचा पोशाख परिधान करून दिंडीत सहभाग घेतला. मुलांनी पांढरी टोपी, कपाळी गंध, पांढरा पायजमा आणि बंडी असा वेश धारण केला होता, तर मुलींनी आकर्षक रंगीबेरंगी साड्या, नथ, फुलांचे गजरे आणि पारंपरिक दागिन्यांनी सजून दिंडीत सहभाग नोंदविला. विठ्ठल, रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत सावता माळी, संत जनाबाई यांच्यासह विविध संतांच्या वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

दिंडीचा प्रारंभ विद्यालयातून झाला. कापड बाजार, नवी पेठ आणि अर्बन बँक मार्गे ही दिंडी पार पडली. मार्गात ठिकठिकाणी नागरिकांनी बाल वारकऱ्यांचे स्वागत करून त्यांच्यावर पुष्पवृष्टी केली. अनेकांनी विद्यार्थ्यांच्या भक्तिभावाचे कौतुक करत ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी हातात टाळ घेऊन अभंग म्हणत "जय जय राम कृष्ण हरी", "ज्ञानोबा-तुकाराम" आणि "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल" अशा नामघोषांनी वातावरण दुमदुमून सोडले. मुलींनी फुगड्यांचा फेर धरत वारकरी परंपरेतील लोकसांस्कृतिक परंपरेचे सुंदर दर्शन घडविले. टाळ-मृदुंगाच्या तालावर विद्यार्थ्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता.

दिंडी पुन्हा विद्यालयात परतल्यानंतर शाळेच्या प्रांगणात पारंपरिक रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांनी अभंग, गवळण, भारुड, कीर्तन, भक्तीगीते आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणे करून उपस्थितांची मने जिंकली. लहानग्यांनी सादर केलेल्या भक्तिरसपूर्ण कार्यक्रमामुळे संपूर्ण विद्यालय परिसर विठ्ठलभक्तीने भारावून गेला.

या उपक्रमामागील उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वारकरी संप्रदायाची परंपरा, संत साहित्याविषयी आदर, भक्ती, संस्कार आणि सामाजिक ऐक्याची भावना रुजविणे हा होता. आधुनिक शिक्षणासोबत सांस्कृतिक व आध्यात्मिक मूल्यांचे जतन करण्याच्या दृष्टीने विद्यालयाचा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली.

या बालदिंडीसाठी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर व माध्यमिकाच्या ज्येष्ठ शिक्षिका सुनीता लांडगे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राथमिक व माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक-शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नियोजन, सजावट, सांस्कृतिक कार्यक्रम आणि दिंडीचे यशस्वी आयोजन करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलचा ३८ वा पदग्रहण समारंभ मोठ्या उत्साहात साजरा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल चा ३८ वा पदग्रहण समारंभ भव्य उत्सवात आणि मोठ्या उत्साहात सेलेस्टिया बँक्वेट्स अँड लॉन्स, सावेडी, अहिल्यानगर येथे पार पडला. या कार्यक्रमाला डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. जयेश पटेल हे मुख्य अतिथी, असिस्टंट गव्हर्नर रो. माधव देशमुख हे विशेष अतिथी, आणि डिस्ट्रिक्ट फर्स्ट लेडी रो. पारुल पटेल या सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदना ने झाली, त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते प्रतीकात्मक वृक्षाला पाणी घालण्याचा समारंभ पार पडला, ज्यातून रोटरीची पर्यावरण संवर्धनाप्रती बांधिलकी अधोरेखित झाली. क्लब सदस्यांनी सर्व मान्यवरांचे मनःपूर्वक स्वागत केले.

मावळते अध्यक्ष रो.सुनील कटारिया यांनी अधिकृतपणे नेतृत्वाची सूत्रे नवीन अध्यक्ष रो. अमर गुरप यांच्याकडे सुपूर्त केली,तर रो. सुनील मुथा यांनी सचिव आणि रो. धीरज मुनोत यांनी खजिनदार म्हणून २०२६२७ या रोटरी वर्षासाठी पदभार स्वीकारला.नवीन पदग्रहण केलेल्या संचालक मंडळाची रचना पुढीलप्रमाणे आहे. उपाध्यक्ष रो. मनीष बोरा, संयुक्त सचिव व अध्यक्ष-नियुक्त रो. संजय मुनोत,आय पी पी व सी एस आर संचालक रो. सुनील कटारिया, सर्जंट-ॲट-आर्म्स रो.सतीश कटारिया,संचालक सार्वजनिक प्रतिमा व क्लब लर्निंग फॅसिलिटेटर रो. ईश्वर बोरा, संचालक क्लब प्रशासन व क्लब ॲक्शन चॅम्पियन रो. प्रसन्न खाजगीवाले, संचालक रोटरी फाउंडेशन व ग्लोबल ग्रँट्स रो. हरीश नय्यर, संचालक सदस्यत्व व फेलोशिप रो. चेतन अमरापुरकर, संचालक सामुदायिक सेवा प्रकल्प रो. गिरीश मुळे,संचालक वैद्यकीय सेवा रो. डॉ.दिलीप बागल, संचालक व्यावसायिक सेवा रो.विजय जुंद्रे, संचालक पोलिओप्लस रो. डॉ.श्रेया खाजगीवाले, संचालक मानवतावादी सेवा रो.राजीव गुजर, संचालक साक्षरता व वॉश इन स्कूल्स (विंन्स) रो.राजेश परदेशी,संचालक विविधता, समता व समावेशन (डीईआय) रो. अजय गांधी, संचालक व बुलेटिन संपादक रो.डॉ.कुणाल कोल्हे,संचालक आंतरराष्ट्रीय सेवा रो.हितेश गुप्ता, संचालक युवा सेवा रो. निलेश मेहेर,संचालक माहिती तंत्रज्ञान रो.अतुल बोरा, संचालक आर आय एम्फॅसिस रो. दत्ता दीक्षित, संचालक डिस्ट्रिक्ट एम्फॅसिस रो.उमेश रेखे, संचालक क्रीडा रो. अभिजीत कोठारी, सल्लागार समिती मध्ये पीडीजी रो. शिरीष रायते आणि रो.डॉ. श्रीकृष्ण जोशी यांचा समावेश आहे. समारंभात सर्व नव-नियुक्त संचालकांचा सन्मान करून त्यांना रोटरी डायरेक्टर पिन्स प्रदान करण्यात आले. तसेच क्लबच्या नव्याने सामील झालेल्या सदस्यांचेही डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो.जयेश पटेल यांच्या हस्ते स्वागत करून त्यांना अधिकृत रोटरी पिन देण्यात आले. मावळते अध्यक्ष रो.सुनील कटारिया यांनी मागील रोटरी वर्षातील क्लबच्या कामगिरीचा आणि सेवा प्रकल्पांचा आढावा सादर केला.आपल्या उद्घाटनपर भाषणात अध्यक्ष रो.अमर गुरप यांनी वर्षासाठीची आपली दृष्टी मांडली. त्यांनी ग्लोबल ग्रँट, हॅपी स्कूल प्रोजेक्ट आणि रोटरीच्या सात फोकस क्षेत्रांवर आधारित शाश्वत सामुदायिक उपक्रम जाहीर केले. तसेच त्यांनी रोटरी फाउंडेशन (टीआरएफ) साठी सदस्यांनी सक्रिय योगदान द्यावे असे आवाहन केले. मुख्य भाषणात डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो.जयेश पटेल यांनी उपस्थितांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी अन्न्स यांचा आदि शक्ती उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग अधोरेखित केला, ज्यामध्ये मी आदि शक्ती, माझे मन, माझी सुरक्षा आणि माझे आरोग्य या चार संकल्पनांवर भर देण्यात आला.

त्यांनी पर्यावरणा साठी एक नाविन्यपूर्ण उपक्रम सादर केला ज्यामध्ये प्लास्टिक कचरा गोळा करून त्याचे पुनर्वापर करून टिकाऊ बाक तयार करून गरजू शाळांना देण्यात येतील. पंढरपूर वारी च्या मूल्यांचा उल्लेख करत त्यांनी त्यातील निःस्वार्थ सेवेची भावना आणि रोटरीच्या तत्त्वांतील साम्य अधोरेखित केले.

# शिर्डीत रोटरी क्लब ऑफ शिर्डी साईबाबा यांच्या वतीने स्वराज्य रक्षक छत्रपती शंभूराजे महानाट्य अभूतपूर्व उत्साहात संपन्न..!



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी –** दिनांक २६ जुलै रोजी स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी रोटरी क्लब ऑफ शिर्डी साईबाबा आणि संस्कृती फाउंडेशन निर्मित एका भव्य महानाट्याचे आयोजन करण्यात आले होते. श्री साईबाबा सांस्कृतिक भवन, शिर्डी येथे पार पडलेल्या या नाट्यामध्ये ''स्वराज्य रक्षक छत्रपती शंभूराजे'' हा दैदिप्यमान इतिहास २५० हून अधिक कलाकारांच्या माध्यमातून पुन्हा एकदा जिवंत करण्यात आला.

संस्कृती फाऊंडेशनने शिर्डी परिसरातील साधारण दोनशे ते अडीचशे स्थानिक कलाकारांना यानिमित्ताने आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करण्याची मोठी सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली होती. या ऐतिहासिक महानाट्यासाठी संस्कृती फाऊंडेशनच्या टीमने आणि निकेश सिसोदिया यांच्या संपूर्ण टीमने तब्बल दीड महिना अहोरात्र मेहनत घेतली, ज्याचे फलित या महानाट्याच्या अभूतपूर्व यशात दिसून आले.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे, प्रीती सुधाजी स्कूल, राहाताचे ज्ञानेश डांगे सर यांनी जवळपास ५०० विद्यार्थ्यांना हे ऐतिहासिक नाटक पाहण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली, ज्यामुळे तरुण पिढीत इतिहासाविषयी आदर आणि जाणिवा प्रगल्भ झाल्या.

सुमारे २५० हून अधिक कलाकारांच्या दमदार अभिनयाने छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास पुन्हा एकदा जिवंत केला. स्वराज्य, शौर्य, त्याग आणि धर्मरक्षणाची प्रेरणादायी गाथा पाहण्यासाठी शिर्डी परिसरातील नागरिकांनी आणि शिवप्रेमींनी सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अभय दुनाखे सर यांनी अत्यंत प्रभावीपणे पार पाडले, तर आभार प्रदर्शन शरद निमसे सर यांनी केले

हा महानाट्य सोहळा यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ शिर्डी साईबाबाचे अध्यक्ष अमोल टिळेकर, सेक्रेटरी हितेश थावाणी, डॉ. पांडुरंग गुंजाळ,डॉ. मधुकर देशमुख, शरद निमसे,राजेंद्र कोते,ज्ञानेश डांगे,रविकिरण डाके,अभयकुमार दुनाखे,विलास कोते ,सतीश वैजापूरकर,गौरव भुजबळ,माजिद पठाण,निलेश गंगवाल,महेंद्र कोते,डॉ. ओमकार जोशी, डॉ. संतोष मैड,साईकुमार मालवाडे, ॲड अविनाश बोठे,दत्तात्रय गोंदकर,सुनील कोते,अरविंद कोते,अरविंद निसळ,राजेंद्र गोंदकर, नानासाहेब बोठे,समीर पठाण,कैलास ऑताडे,यशोदीप शेटे,चेतन लोढा, ॲड संकेत जानी, सौ उषाकिरण कोते , सौ प्रनजा भुजबळ, सौ पूनम कोते व सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि सदस्यांनी मोलाचे सहकार्य व परिश्रम घेतले.

# बेलवंडीत कारगिल विजय दिवस देशभक्तीच्या वातावरणात साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथे शहीद स्मारक समिती, श्रीगोंदा व भैरवनाथ माजी सैनिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने साई मंगल कार्यालयात कारगिल विजय दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी कारगिल युद्धातील शहीद जवानांच्या स्मरणार्थ भव्य रॅली काढण्यात आली. देशभक्तीपर गीतांनी आणि घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. त्यानंतर शहीद जवानांच्या प्रतिमेस पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी बेलवंडीचे लोकनियुक्त सरपंच ऋषिकेश शेलार, भैरवनाथ सेवा सोसायटीचे माजी चेअरमन दिनेश इथापे, युवा नेते दिग्विजय नागवडे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष सुभाषराव काळाणे, माजी सरपंच दिलीप रासकर, युवराज पवार, डॉ. अशोक शेलार यांच्यासह आजी-माजी सैनिक, पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

सरपंच ऋषिकेश शेलार यांनी कारगिल युद्धातील भारतीय सैनिकांच्या शौर्याचे स्मरण करून त्यांच्या बलिदानाचा अभिमान प्रत्येक भारतीयाने कायम जपला पाहिजे, असे प्रतिपादन केले. युवा नेते दिग्विजय नागवडे, माजी सैनिक नवनाथ खामकर यांनीही मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परमेश्वर घोडके होते. तालुक्यातील विविध गावांतील आजी-माजी सैनिक, त्यांचे कुटुंबीय, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केशव कातोरे यांनी केले. एकनाथ पवार यांनी स्वागत, तर जिल्हाध्यक्ष संदीप सांगळे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भैरवनाथ माजी सैनिक संघ, बेलवंडी व शहीद स्मारक समिती, श्रीगोंदा यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अध्ययन आणि अध्यापन हा शाळेचा आत्मा आहे – सिताराम खिलारी

## ढोकेश्वर विद्यालयात पालकशिक्षक मेळावा उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर–** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत सर्वात अधिक आस्था आणि काळजी असणारा पहिला घटक हा पालक असतो. पाल्यावर चांगले संस्कार व्हावे, त्याला शिस्त लागावी ही अपेक्षा पालकांची असते. आणि दुसरा घटक हा शिक्षक असतो शिक्षक हा विदयार्थ्यांचे भवितव्य घडविणारा शिल्पकार असतो. म्हणून विद्यालयात अध्ययन आणि अध्यापन हे सातत्याने चालले पाहिजे तो शाळेचा आत्मा आहे असे प्रतिपादन अहमदनगर जिल्ह मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम आण्णा खिलारी यांनी केले.

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर विद्यालयात पालकशिक्षक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. त्यावेळी सिताराम खिलारी अध्यक्ष स्थाना वरून बोलत होते. मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मंगेश खिलारी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष लहुशेठ जाधव, उपाध्यक्ष शिवराज भालके, सचिन बांडे, कैलास झावरे, ग्रामपंचायत सदस्य दत्ताभाऊ निवडुंगे, प्रशांत तराळ यांनी महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर विचार मांडले.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी नियमित अध्यापनाबरोबरच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग, विद्यार्थी हिताचे विविध उपक्रम, तसेच शैक्षणिक प्रगतीसाठी पालकांनी सहकार्य करावे असे आवाहन प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी केले.

विद्यालयात विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा झाली. विद्यालयात लोकसहभागातून आरो सिस्टीम बसविण्याचे ठरले. याप्रसंगी काही शिक्षक व पालकांनी आपले योगदान जाहीर केले. तसेच ग्रंथालय समृद्धी साठी कै. काशिनाथ पा. खिलारी यांच्या मंगेश खिलारी यांनी तर कै. शोभा गायकवाड यांच्या स्मारणार्थ संजय मोरे यांनी प्रत्येकी २५ पुस्तके देण्याचे कबूल केले.

इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र पालक मेळावा आयोजित करून बोर्ड परीक्षेची तयारी, अभ्यासाचे नियोजन, नियमित उपस्थिती, सराव परीक्षा, करिअर मार्गदर्शन यासाठी विचार विनिमय करण्याचे ठरले.

यावेळी काजल आल्हाट, मनिषा दिवेकर, अर्चना ठाणगे या महिला पालकांनी देखील विद्यालयाच्या शैक्षणिक उपक्रमांबाबत अडचणी मांडल्या व सूचना केल्या. विद्यालय प्रशासनाने सर्व सूचना सकारात्मकरीत्या स्वीकारून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सातत्याने कार्य करण्यासाठी आम्ही बांधील आहोत असे पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी सांगितले. यावेळी किरण झावरे, प्रेमानंद महाराज आंबेकर, जयवंत गोरडे, आनंदा झरेकर, पत्रकार बाळासाहेब गायकवाड, पत्रकार श्रीनिवास शिंदे, पत्रकार संजय मोरे इत्यादी पालक उपस्थित होते.

मेळाव्याच्या यशस्वी नियोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना जाधव यांनी केले, प्रास्ताविक बाबासाहेब जाधव यांनी केले, अध्यक्षीय निवड सोनल रोहकले यांनी केली, अनुमोदन प्रिया डव्हणे यांनी दिले तर आभार वैशाली गायखे यांनी मानले.

# हुतात्मा स्मारकात कारगिल विजय दिवस साजरा

## मेणबत्त्या प्रज्वलीत करुन व पुष्पचक्र अर्पण करुन शहिदांना अभिवादन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कारगिल युद्धातील भारतीय जवानांच्या अद्वितीय शौर्य, पराक्रम आणि सर्वोच्च बलिदानाचे स्मरण करत शहरातील हुतात्मा स्मारक येथे रविवारी (दि. २६ जुलै) कारगिल विजय दिवस अत्यंत देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. देशभक्तीपर गीतांनी भारावलेल्या वातावरणात 'भारत माता की जय', 'वंदे मातरम', 'शहीद जवान अमर रहे' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि युवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत शहीद जवानांना श्रध्दांजली वाहिली.



कार्यक्रमाची सुरुवात हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी मेणबत्त्या प्रज्वलित करून कारगिल युद्धात मातृभूमीसाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वीर जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या सैनिकांचे स्मरण करत उपस्थितांनी काही क्षण मौन पाळून त्यांच्या त्यागाला मानवंदना दिली.

यावेळी लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगरचे अध्यक्ष हरजितसिंह वधवा, सचिव हरिश हरवानी, खजिनदार विजय कुलकर्णी, डॉ. संजय असनानी, डॉ. मानसी असनानी, प्रशांत मुनोत, सीए किरण भंडारी, सुनिल छाजेड, भावना छाजेड, दिलीप कुलकर्णी, पै. नाना डोंगरे, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे विवेक कसबे, गोविंद राजगुरू, प्रतिक ठोकळ, अविनाश साठे, अजित कुऱ्हाडे यांच्यासह लायन्स क्लबचे पदाधिकारी, सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हरजितसिंह वधवा म्हणाले की, ''कारगिलच्या रणभूमीवर भारतीय जवानांनी दाखविलेला पराक्रम प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. देशाच्या सीमांचे रक्षण करताना आपल्या प्राणांची पर्वा न करता त्यांनी दिलेले बलिदान कधीही विसरता कामा नये. प्रत्येक नागरिकाने आणि विशेषतः युवकांनी मनात देशभक्तीची ज्योत तेवत ठेवून देशहितासाठी आपले योगदान देण्याचा संकल्प करावा.''
ते पुढे म्हणाले की, देश सुरक्षित असल्यामुळेच आपण शांततेत जीवन जगत आहोत.

(पान १ वरून)

## रुग्णवाहिका नाकारल्याने चिमुरड्यांचा मृत्यू?

उपअधीक्षक सुजितकुमार क्षीरसागर यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून नाराजी व्यक्त केली. लोणीव्यंकनाथ येथील घटनेची न्याय्य पद्धतीने हाताळणी न करता दूषित हेतूने कारवाई झाल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी बोलताना खासदार लंके म्हणाले, संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शासनाकडून उपलब्ध असलेली वैद्यकीय सेवा या निष्पाप चिमुरड्यांना दिली नाही. इतकेच नव्हे तर या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करून आंदोलकांवरच गुन्हे दाखल करण्यात आले. एखादा गुन्हा दाखल करण्यापूर्वी पोलीस अनेक बाजूंचा विचार करतात; मात्र या प्रकरणात पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी रात्री उशिरापर्यंत थांबून गुन्हा दाखल केल्यामुळे त्यांच्या भूमिकेबाबत संशय निर्माण होत असल्याचा आरोप त्यांनी केला.
आंदोलनस्थळी जाऊन प्रथम आंदोलकांच्या भावना समजून घेणे आवश्यक होते. पोलीस अधिकाऱ्यांनी कोणाच्याही दबावाखाली किंवा हातचे बाहुले बनून काम न करता निष्पक्षपणे कर्तव्य पार पाडावे. आंदोलकांना लक्ष्य करण्याच्या भावनेतून कारवाई होणे लोकशाहीसाठी योग्य नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून डॉ. प्रशांत मुळे आणि डॉ. शैला डांगे यांच्यावर कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणीही खासदार लंके यांनी केली. अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ज्योती मांडगे यांनी घटनास्थळी भेट दिल्यानंतर चिमुरड्यांना वेळेत वैद्यकीय सेवा का मिळाली नाही, याची वस्तुस्थिती जाणून न घेता बेजबाबदार विधाने केल्याचा आरोपही त्यांनी केला. शासनाच्या १०२ रुग्णवाहिका सेवेसंदर्भातील परिपत्रक, संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांची नकारात्मक भूमिका आणि त्यातून दोन निष्पाप चिमुरड्यांचा झालेला मृत्यू हा अत्यंत गंभीर विषय असून हा संपूर्ण मुद्दा संसदेत मांडणार असल्याचेही खासदार नीलेश लंके यांनी यावेळी जाहीर केले.

## सराईत चोराकडून पाच मोटारसायकली हस्तगत

यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि संतोष मुटकुळे यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदाराच्या आधारे तपास सुरू केला. आरोपी किशोर पठारे हा चोरीच्या गाडीवरून रामवाडीकडून तारकपूर बस स्टँडकडे येत असताना पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.
चौकशीत आरोपीकडून तोफखाना पोलीस ठाण्यातील १, तसेच पुणे जिल्ह्यातील रांजणगाव आणि शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील प्रत्येकी १ असे एकूण ३ गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपीला पुढील तपासासाठी तोफखाना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

## सत्तेतील आमदार असलात तरी लोकहितासाठी वेळप्रसंगी प्रशासनाविरोधात आंदोलन करा

ते म्हणाले की, पूर्वी ज्या पद्धतीने काम चालत होते, ती कार्यपद्धती आता बदलण्याची वेळ आली आहे. सर्वसामान्य नागरिकांशी सन्मानाने वागावे, त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे आणि त्यांना शासकीय कार्यालयांचे हेलपाटे मारायला लावू नयेत. जनतेला तुमची खुर्ची किंवा गाडी नको आहे, त्यांना वेळेत न्याय आणि सन्मानाची वागणूक हवी आहे, असे ते म्हणाले. पुढे बोलताना ते म्हणाले की नेवासा तालुका गुन्हेगारीमुक्त करण्यासाठी कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नसून, महिलांवरील अत्याचार, बलात्कार, खून यांसारख्या गंभीर गुन्ह्यांतील आरोपींविरोधात कठोर कारवाई केली जाईल. गुन्हेगारांच्या मतांसाठी तत्त्वांशी तडजोड करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्याचबरोबर शासनाच्या योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाच्या माध्यमातून हजारो नागरिकांना दिलासा मिळत असल्याचे प्रतिपादन भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. यावेळी बोलताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाच्या च्या माध्यमातून अवघ्या एका महिन्यात पाच हजारांहून अधिक नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे. शासनाच्या सेवा व सुविधा नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचविण्यासाठी हे अभियान प्रभावी ठरत असून, सर्वसामान्यांना शासकीय कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी महायुती सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी पदापेक्षा जनतेची सेवा महत्त्वाची असल्याचे सांगितले. पद मिळविण्यापेक्षा गरिबांचे प्रश्न सोडविणे हेच सर्वात मोठे कार्य आहे. समाजसेवा करणाऱ्यालाच जनता कायम साथ देते,असे सांगत पदाच्या राजकारणात न अडकता जनतेची कामे करण्याचे आवाहन त्यांनी केले. नेवासा तालुक्यातील रस्ते, जमीनविषयक वाद आणि महसूल प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी महसूल प्रशासनाने घटनास्थळी जाऊन निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. अधिकारी काम करत नसतील, तर लोकप्रतिनिधींनीही जनतेच्या प्रश्नांसाठी आंदोलन करण्यास मागे-पुढे पाहू नये. सत्ता नव्हे, तर जनता मोठी असते, असेही त्यांनी स्पष्ट केले. आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी सांगितले की, तालुक्यातील ११ मंडळांमध्ये आयोजित २२ शिबिरांमधून सुमारे ७ हजार ५०० नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. डिजिटल सातबारा, वारस नोंद, फेरफार यांसह महसूल विभागाच्या विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. यासाठी १३ विविध शासकीय विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. महिला सक्षमीकरणाबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, तालुक्यात २ हजार ३५ बचत गट कार्यरत असून त्यामध्ये २५ हजार ५०० महिला सहभागी आहेत. अधिकाधिक महिला बचत गट स्थापन करून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. नेवासा शहरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अतिक्रमणधारकांच्या प्रश्नावर संबंधित विभागांची संयुक्त बैठक घेऊन तोडगा काढण्यात येईल. तसेच तालुक्यातील सिंचन आणि पाणी नियोजनासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या प्रयत्नांचेही आमदार लंगे पाटील यांनी कौतुक केले. आरोग्य सेवांबाबत बोलताना त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये स्थानिक पातळीवर अधिकाधिक उपचार उपलब्ध करून देण्यावर भर दिला. गंभीर रुग्णांना उच्चस्तरीय रुग्णालयात तातडीने उपचारासाठी पाठविण्याची सक्षम व्यवस्था उभारली जात असून, नव्याने बांधण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी निवासस्थानी डॉक्टर वास्तव्यास राहतील, याचीही दक्षता घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संघर्षातून पुढे आलेले नेतृत्वच विकासाला गती देऊ शकते, असे सांगत डॉ. सुजय विखे पाटील यांनी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या कार्याचे कौतुक केले. महायुती सरकारच्या माध्यमातून नेवासा तालुक्यातील सर्व प्रलंबित विकासकामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी व पाठबळ दिले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. नेवासा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी लवकरच विस्तृत बैठक घेण्यात येणार असून, अतिक्रमण नियमितीकरण, शहर विकास आणि गुन्हेगारीवर नियंत्रण यासाठी ठोस निर्णय घेतले जातील. अतिक्रमण आणि अवैध व्यवसायांमधून अनेकदा गुन्हेगारीला खतपाणी मिळते. त्यामुळे अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई करून नेवासा तालुका गुन्हेगारीमुक्त करण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी एकत्रितपणे काम करतील, असा विश्वास डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.

## नवीन नेहरू मार्केटला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्यापारी संकुल' नामकरणाची मागणी

` त्यांच्या जन्मभूमीत उभारल्या जाणाऱ्या या महत्त्वपूर्ण व्यापारी संकुलास त्यांचे नाव देणे ही त्यांना खरी आदरांजली ठरेल.
या निर्णयामुळे नव्या पिढीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या महान कार्याची ओळख होईल, तसेच अहिल्यानगरच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक वारशाचे जतन करण्यासही मोठी मदत होईल. त्यामुळे चितळे रोड येथील नव्याने विकसित होत असलेल्या नेहरू मार्केट (भाजी मंडई व व्यापारी संकुल) या इमारतीस ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्यापारी संकुल'' असे नाव देण्याचा ठराव करून त्यास मान्यता द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.
नगरसेविका मयुरी जाधव यांनी आपल्या निवेदनात शहरातील घरपट्टीच्या प्रश्नाकडेही लक्ष वेधले आहे. त्यांनी म्हटले आहे की, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या हद्दीत आकारण्यात येत असलेल्या घरपट्टीचा राज्यातील इतर ड वर्ग महानगरपालिकांमध्ये आकारण्यात येणाऱ्या घरपट्टीशी तुलनात्मक अभ्यास करून सुधारित पद्धतीने अंमलबजावणी करण्याचा विचार करावा.
सध्या शहरामध्ये घरपट्टीबाबत नागरिकांच्या मनात मोठ्या प्रमाणावर संभ्रम आणि नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे पुढील आर्थिक वर्षापासून घरपट्टी आकारणी करताना महाराष्ट्रातील इतर ड वर्ग महानगरपालिकांमध्ये कोणत्या निकषांवर आणि कोणत्या पद्धतीने घरपट्टी आकारली जाते, याचा सखोल अभ्यास करून त्यातील योग्य बाबी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या क्षेत्रात लागू कराव्यात, अशी नम्र विनंती त्यांनी निवेदनातून केली आहे.
यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर होण्यास मदत होईल, घरपट्टी आकारणी अधिक पारदर्शक, न्याय्य आणि नागरिकाभिमुख होईल, तसेच सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळेल, असा विश्वास नगरसेविका मयुरी जाधव यांनी व्यक्त केला.

## माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त ठाकरे शिवसेनेचे मोफत रक्त चाचणी शिबिर उत्साहात

शिवसेनेच्या माध्यमातून अशाच विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि जनहिताच्या उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यात येईल. शहर शिवसेनेने शिबिर यशस्वी करण्यासाठी मेट्रोपोलिस हेल्थकेअर लिमिटेडच्या सर्व डॉक्टर, तंत्रज्ञ आणि कर्मचाऱ्यांचे तसेच उपस्थित राहून लाभ घेतलेल्या सर्व नागरिकांचे यावेळी आभार मानले. यावेळी जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, उपजिल्हाप्रमुख दीपक भोसले, उपशहर प्रमुख मनोज गुंदेचा, उपशहर प्रमुख सुनील भोसले, युवा सेना जिल्हाप्रमुख निलेश खोडदे, अल्पसंख्यांक आघाडीचे अनिस चुडीवाला, कामगार आघाडीचे जिल्हाप्रमुख विलास उबाळे, केडगाव शिवसेनेचे प्रतीक बारसे, राम वाणी, राम झिने, महिला आघाडीच्या नलिनी गायकवाड, उषा भगत, शैला लांडे, वेणूबाई वाणी, रजनी ताठे, विकेश गुंदेचा, सागर चाबुकस्वार, चंद्रकांत उजागरे, सचिन नवघिरे, शंकर आव्हाड, गणेश आपरे, राम धोत्रे, आकाश अल्हाट, विकास भिंगारदिवे, विजय शिरसाट, महावीर मुथा, किशोर कोतकर, आप्पा लांडगे, बाबासाहेब वैरागर, जयराम आखाडे, सुमित चव्हाण आदींसह शिवसैनिक, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.